नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २४/०२/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १३ कि.मी अंतरावरील मौजा डुमरी शिवार परशिवनी येथे दिनांक २१/०२/२०२२ चे २३.०० वा. चे दिनांक २२/०२/२०२२ चे ००.३० वा. दरम्यान फिर्यादी यांना मिळालेल्या माहीती वरून घटनास्थळी जावुन पाहणी केली असता सदर ठिकाणी दोन १० चक्का ट्रक टाटा कंपनीचा व एक टाटा योध्दा पिकअप गाडी उभी असल्याचे दिसुन आले. वाहनाची पाहणी केली असता एम.एच– २८/बी– ८६७१ क्रमांकाच्या टाटा ट्रक मध्ये २१ बैलांना कोंढुन त्यांचे पाय व तोंड बांधुन चाऱ्या पाण्याची सोय न करता निर्दयतेने व क्रुरपणे कत्तली करीता ट्रक मध्ये भरलेले दिसुन आले. सदर गोवंश बाबत आरोपी क्र. १. मो. अनिस अब्दुल कुरेशी वय ३८ वर्ष रा. चौधरी मस्जिद मागे कामटी २. शेख सलमा शेख बशिर वय २१ वर्ष रा. भाजी मंडी सैययदशाह दर्गा जवळ कन्हान, ३. रशिद वल्द बद्रुजमा बेग वय ३१ वर्ष रा. यशोदानगर चौक हमीद नगर वार्ड नं नागपुर व ४. जेहरु महरुम साहीब खान वय ३० वर्ष रा. कामगार नगर नारी रोड नागपुर यांना विचारणा केली असता त्यांनी फिर्यादी सोबत शाब्दीक वाद करुन हाताने ढकलुन शासकिय कामात अडथळा निर्माण केला. आरोपीतांच्या ताब्यातुन १. एम.एच– २८/बी– ८६७१ क्रमांकाच्या टाटा ट्रक कि. २०,००,०००/–रू., एमएच–४०/सीबी– २२०२ क्रमांकाच्या १० चाकी टाटा ट्रक किमती २०,००,०००/–रु., ३. एमएच–४०/बीएल–६२२५ क्रमांकाची टाटा योध्दा किमती ५,००,०००/–रू. व तीन्ही वाहनातील एकुण जनावरे ९२ (बैल, गोरे, गायी) असा एकुण वाहनासह कि. ५३,०५,०००/– रु. चा माल जप्त करून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी पोलिस शिपाई शरद गिते यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३५३, ३४ भादंवी. ५ए, ५बी, ९ महाराष्ट्र पशु संक्षण अधिनीयम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांना आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री महेश सुरजुसे मो.क्र. ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मोरगाव येथे दिनांक २२/०२/२०२२ चे १६.०० वा. ते दिनांक २३/०२/२०२२ चे ०७.०० वा. रोजी फिर्यादी नामे– बालचंद श्यामराव निंबुळकर वय ४७ वर्ष रा. मोरगाव यांचे किराणा दुकानाचे अज्ञात आरोपीने लोखंडी शटरचे कुलुप तोडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने परमात्मा एक संमेलन ची वर्गणी केलेले ७५,०००/–रु. प्लास्टीक बरणीत ठेवलेले व दुकान मधील सामानाची विक्री झालेले २५,०००/–रु. जर्मन डब्यात ठेवलेले असे एकुण रक्कम १,००,०००/–रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री चाबुकस्वार मो.नं. ८८३०९००९६६ हे करीत आहे.

## विनयभंग

**१) पो.स्टे. पारशिवनी** :— दिनांक २३/०२/२०२२ चे १४.३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय ३७ वर्षीय ही तीचे परिवारासबोत सहलीसाठी पारशिवनी येथील घोघरा देवस्थानात आली असता आरोपी नामे— संजय भरत यादव वय ३० वर्ष, रा. टेका नाका नागपुर याने फिर्यादीस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. फिर्यादी सोबत असलेले तिचे जावई यांनी त्यास हटकले असता आरोपीने फिर्यादीचे जावई यांना हातबुक्कीने मारहाण करून शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (डी), ३२३, ५०४ भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी याचा एमसीआर करून जामीनवर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिलीप बासोडे मो क्र ९८२३०८३९०५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :— दिनांक २२/०२/२०२२ चे १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही पायदळ शाळेत रोडने जात असतांना तिचे सोबत तिची मैत्रिण होती. तेव्हा विधीसंघर्ष बालक वय १७ वर्ष याने मोटरसायकलने तिचा पाठलाग करीत तिच्या जवळ जावुन एकसारखा पाहत ईशारा करून म्हणाला की, ‘मी तुझ्यावर प्रेम करतो’ या घटनेने फिर्यादी अल्पवयीन मुलगी घाबरून गेली. फिर्यादी अल्पवयीन मुलीने विधीसंघर्ष बालक यास ‘मी तुझावर प्रेम करीत नाही, तु माझा पाठलाग करू नको’ असे सांगुन सुध्दा यातील विधीसंघर्ष बालकाने फिर्यादीचा पाठलाग करून विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३५४(ड) भादंवी. सहकलम ८,१२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रशांत खोब्रागडे मो. क्र.८८८८८१७१८३ हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. काटोल** :— फिर्यादी नामे— सौ विदया मिलींद निकोसे वय ३२ वर्ष रा. श्री गंगाधर सोमकुवर यांचे घरी तांदुळवाणी ता. काटोल व आरोपी नामे— १) पति— मिलीद भगवान निकोसे हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत ४० कि.मी. अंतरावरील खापा (नरसाळा),ता. सावनेर येथे दिनांक ०५/०१/२०२० ते दिनांक ०५/०२/२०२१ पर्यंत आरोपी नामे— १) व २) श्रीमती बेबीबाई भगवान निकोसे दोन्ही रा. खापा नरसाळा ता. सावनेर व ३) प्रिया प्रविण पाटील रा. गणेश नगरी कोराडी रोड नागपुर यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि श्रीमती पुनम कोरडे मो.क्र. ७२७६३३०४५५ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**